शनिवार, २२ नोव्हेंबर २०१४ प्रहार

# आजीवन अध्ययन विभागाचा विस्तार समाजाभिमुख होण्याची गरज

**■ लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयात प्रशिक्षण शिबीर**

**■ प्रा. डॉ. कुणाल जाधव यांचे प्रतिपादन**

▶ सावंतवाडी (प्रतिनिधी)

विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचा व्याप वाढत असून १८५०० विद्यार्थ्यांसह २०१ महाविद्यालये या विभागात सहभागी झाले आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रात ७२९ महाविद्यालये असून अजूनही या विभागाच्या विस्तारास भरपूर वाव आहे. आयुष्यभर शिक्षण घेत असताना या शिक्षणाचा उपयोग समाजातील तळागाळातील घटकांपर्यंत पोहोचणे आवश्यक असून त्यादृष्टीने सदर विभाग कार्यरत असल्याचे प्रतिपादन मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. कुणाल जाधव यांनी केले.

येथील लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयात आयोजित केलेल्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या द्वितीय सत्रातील प्रशिक्षण



**लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयात आयोजित आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या द्वितीय सत्राच्या प्रशिक्षण शिबिरात बोलताना प्राध्यापक डॉ. कुणाल जाधव व अन्य**

शिबिरात ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, प्राचार्य यशोधन गवस, प्रा. अरुण पणदुरकर, प्रा. डॉ. आर. एस. इंगळे उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी दोडामार्गची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगून आजीवन अध्ययन विभागाची वाटचाल प्रभावीपणे होत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. प्रा. पणदुरकर यांनी शिक्षणाचा समाजासाठी सातत्याने वापर होण्याची गरज प्रतिपादीत केली.

प्राचार्य गवस यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. यावेळी प्रा. डॉ. जाधव यांचा प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला व त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी प्रा. यशोधन गवस, प्रा. एम. ए. ठाकुर, प्रा. राजेंद्र मुंबरकर, प्रा. एस. एन. पाटील, प्रा. भेंकी आदी विविध महाविद्यालयांच्या विस्तार शिक्षकांनी मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक व स्वागत प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी तर आभार डॉ. इंगळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. बेग यांनी केले. या शिबिरात जिल्ह्यातील २४ वरिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी, व्यवस्थापक, विस्तार शिक्षक व क्षेत्र समन्वयकांनी सहभाग घेतला.